(32)

विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, वैधिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदव्या/पदविका समकक्षता

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. समक १०९९/११४/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ जून, १९९९

संदर्भ:-१. शासन निर्णय, पॉलिटीकल अन्ड सर्विस डिपार्टमेंट क्र. २०६/४६ दिनांक ४.११.१९५०.

२. शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्र. पीएचई १९६२/२०८४८-सी, दिनांक १९.५.१९६४.

३. शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्र. एसएसएन २२६४/ई, दिनांक १६.३.१९६८.

४. .शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्र. एचएनई ११६९/३२१२७ क्यू, दिनांक ६.४.१९७०.

५. .शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्र. एचएनई ११७०/३६४४३ ऊ, दिनांक १६.४.१९७०

६. .शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्र. एलएलई ११७१/९८३१९-ऊ, दिनांक १.११.१९७१.

७. शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. युएससी १३७०/१०३८७६० यू, दिनांक ७.१०.१९७३.

८. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग क्र. एचएनई १४७६/२११७-अठ्ठावीस-(११०), दिनांक १०.७.१९७६.

९. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एचएनई १४७०/२०६८२/अठ्ठावीस (१२४०), दिनांक ३०.१०.१९७६.

१०. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एचएनई ११६९/८८२७१-अठ्ठावीस (७०), दिनांक ३०.११.१९७६.

११. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसएससी १०७३/१२२४/२५, दिनांक ५.३.१९७७.

१२. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसएससी २१७५/१४०५/२५, दिनांक १७.११.१९७७

१३. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसकेई १६७८/१६०५६८/(४०४३)/विशि-१, दिनांक १.१२.१९८०.

१४. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसटीसी २२८०/१६५९५९/(२०२/८०)/माशि-४, दिनांक ८.१.१९८२.

१५. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसएससी २९५९/७२०५२/(२५०३)/युनि-५, दिनांक १४.२.१९८३.

१६. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एसएससी १०८२/१२४१२०/(५८३)/विशि-५, दिनांक १७.१.१९८४.

१७. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एचएससी १०८५/१०४२६८/(१५६१)/उमाशि-१, दिनांक ८.४.१९८५.

१८. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. एचएससी १२८५/११०४२/७९७८६)/उमाशि-१, दिनांक ८.८.१९८५.

१९. शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्र. युएसजी १०८५/११५१०५/(७१)/विशि-५, दिनांक २७.६.१९८६.

२०. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एसटीसी २२८२/८६०५०/(१९२/८७)/विशि-५, दि.८.६.९२.

२१. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एचएससी १०९२/५८८७८/(२०५)/विशि-२, दि. १९.११.९३.

२२. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एचएससी २०९३/१०९२८/(१३०)/मशि-४, दि. १२.१०.९४.

२३. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एचएससी १०९४/११७२/(३१)/मशि-४, दि. १२.१०.१९९४.

२४. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एचएससी १०९५/२३८१३/(७१)/मशि-४, दि. ९.८.१९९५.

२५. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी २०९३/(४०१६)/विशि-४, दिनांक ७.१२.१९९५.

२६. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०९४/(१६२)/मशि-४, दिनांक १०.१.१९९६.

**प्रस्तावना:-** भारत सरकारने देशातील काही स्वैच्छिक हिंदी संस्थांच्या विविध परीक्षांना मान्यता दिली आहे. तसेच संस्कृत विश्वविद्यालयाच्या परीक्षानाही मान्यता दिली आहे. राज्यातील विद्यापीठे व इतर राज्यातील विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या/पदविकानाही मान्यता दिल्या आहेत. अशा पदवी/पदविका धारकाना समकक्षता देण्याचे वेळोवेळी शासनाने मान्य केले आहे असे पदवी/पदविका धारक राज्यातील निरनिराळया ठराविक पदावरच नेमणूकीसाठी पात्र धरण्याचा निर्णय झाला आहे. ते विचारांत घेऊन अशा सर्व पदवी/पदविका एकत्रित करण्याचा प्रश्न विचाराधीन होता.

**शासन निर्णय**:-संदर्भिय शासन निर्णयान्वये, भारतातील ऐच्छिक हिंदी संस्था, ऐच्छिक संस्कृत संस्था, यांनी प्रदान केलेल्या परीक्षांना समकक्ष परीक्षांचा दर्जा, केंद्र शासनाच्या सुचनेनुसार मान्य केला आहे. तसेच केंद्रिय किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेल्या पदव्या/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था स्थापित केल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने घोषित केलेल्या मानीव विद्यापीठांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना समकक्ष दर्जा देण्याची मान्यता या निर्णयाद्वारे देण्यांत येत आहे.

२. ज्या पदवी/पदविकांना समकक्षता दिलेली आहे त्या सोबतच्या विवरणपत्र ''अ'' मध्ये देण्यांत आल्या आहेत.

३. विवरणपत्र ''अ'' मध्ये दर्शविलेली समकक्षता ही खालील अटीवर राहील.

अ) ऐच्छिक हिंदी संस्थाच्या परिक्षांना दिलेली मान्यता ही समकक्ष म्हणून नमूद केलेल्या परीक्षेसाठी विहित केलेल्या हिंदीच्या दर्जा पुरतीच मर्यादित असेल. संपूर्ण पदवी परीक्षेच्या बरोबर त्यांना मान्यता मिळणार नाही.

ब) ही मान्यता फक्त दुय्यम शाळेतील हिंदी शिक्षकांच्या जागेवर नेमणूक करतेवेळी विचारात घेतली जावी व या प्रमाणे शैक्षणिक पात्रता धारकांची हिंदी शिक्षकांच्या जागेवर नेमणूक करताना त्यांना हिंदी शिक्षकांची मंजूर केलेली वेतनश्रेणी द्यावी.

क) तसेच संस्कृत मंडळाच्या संस्कृत परिक्षांची अर्हताधारक फक्त राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तसेच विद्यापीठामध्ये फक्त संस्कृत शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यासाठी व संस्कृत शिक्षकांना मिळणारी वेतनश्रेणीस पात्र ठरतील.

४. संदर्भिय शासन निर्णयान्वये समकक्षेस मान्यता देण्यापूर्वी त्यास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची सहमती घेण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म. अ. सरपोतदार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत

१. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

6

----

५. संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७. सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, अमरावती, जळगांव, नांदेड

८. विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती.

९. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर. (लेखा व अनुज्ञेयता)

१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर. (लेखा परीक्षा)

११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१३. सर्व जिल्हा परिषदाचे शिक्षणाधिकारी/शिक्षक निरिक्षक, बृहन्मुंबई.

पत्रद्वारे

१४. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई

१५. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे

१६. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१७. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१८. कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

१९. कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

२०. कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२१. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

२२. कुलसचिव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२३. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

२४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.



पोल. १८८९ /[illegible]

# परिशिष्ट "अ"

| क्र. | संस्थेचे नाव | मान्यता दिलेल्या परीक्षा | समकक्ष परीक्षेसाठी विहित केलेला दर्जा |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | काशि विद्यापीठ, बनारस | शास्त्री पदवी | बी. ए. |
| २. | लक्ष्मीबाई कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, ग्वाल्हेर | बी. पी. ई. | पदवी/डीप्लोमा इन फिजिकल एज्युकेशन |
| ३. | अ) वाराणसी संस्कृत विश्व विद्यालय, वाराणसी | आचार्य<br>शिक्षा/शास्त्री | एम. ए.<br>बी. एड |
| | ब) बिहार संस्कृत असो. पाटणा व कमेश्वरसिंग संस्कृत विद्यापीठ, दरभंगा | शास्त्री<br>आचार्य<br>शिक्षाशास्त्री | बी. ए.<br>एम. ए.<br>बी. एड |
| | क) राजस्थान शासन<br>ड) बनारस हिंदु विद्यापीठ, वाराणसी<br>इ) लखनौ विद्यापीठ, लखनौ | | |
| ४. | मद्रास विद्यापीठ, मद्रास व अण्णामलाई विद्यापीठ, मद्रास | १) शिरोमणी (पूर्व)<br>२) शिरोमणी (अंतीम) | १) बी. ए.<br>२) बी. ए. |
| ५. | आसाम शासन संस्कृत समिती, गौहाटी | उपाधी | बी. ए. |
| ६. | म्हैसूर शासन | १) विद्वत मध्यमा<br>२) विद्वत उत्तमा | बी. ए.<br>एम. ए. |
| ७. | केरळ शासन | १) शास्त्रभूषण (पुर्व)<br>२) शास्त्र भूषण (अंतीम) | बी. ए.<br>एम. ए. |
| ८. | आंध्र विद्यापीठ, वलटेन | १) विद्या प्रविण (पुणे)<br>२) विद्या प्रविण (अंतीम) | बी. ए.<br>एम. ए. |
| ९. | पंजाब विद्यापीठ, चंदिगड | १) शास्त्री<br>२) आचार्य | बी. ए.<br>एम. ए. |
| १०. | गुरुकूल, वृंदावन | १) शिरोमणी<br>२) आचार्य | बी. ए.<br>एम. ए. |
| ११. | केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती | शास्त्री (शिक्षा) | बी. एड किंवा बी.टी. |
| १२. | केंद्रीय हिंदी शिक्षण मंडळ, आग्रा | १) हिंदी शिक्षण पारंगत (एक वर्षाचा अभ्यासक्रम)<br>२) हिंदी शिक्षण पारंगत | बी. टी./बी. एड<br>एस. टी. सी./ |

| | (दोन वर्षांचा अभ्यासक्रम) | टी.डी./डीप्लोमा इन एज्युकेशन एक्झामीनेशन |
|---|---|---|
| १३. हिंदी साहित्य सम्मेलन, अलाहाबाद | १) प्रथमा | १) एस.एस.सी. |
| | २) मध्यमा (विशारद) | २) बी. ए. |
| | ३) उत्तमा (हिंदी साहित्य) | ३) बी.ए. ऑनर्स |
| १४. राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा | १) परिचय | १) एस.एस.सी. |
| | २) कोविद | २) इंटर (बारावी) |
| | ३) रत्न | ३) बी.ए. |
| १५. दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, मद्रास | १) प्रवेशिका | १) एस.एस.सी. |
| | २) विशारद | २) इंटर (बारावी) |
| | ३) प्रवीण | ३) बी.ए. |
| १६. हिंदी विद्यापीठ, देवधर | १) प्रवेशिका | १) एस.एस.सी. |
| | २) साहित्य भूषण | २) इंटर (बारावी) |
| | ३) साहित्यालंकार | ३) बी.ए. |
| १७. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे | १) प्रबोध | १) एस.एस.सी. |
| | २) प्रवीण | २) इंटर (बारावी) |
| | ३) पंडीत | ३) बी.ए. |
| १८. हिंदी प्रचार सभा, हैद्राबाद | १) विशारद | १) एस.एस.सी. |
| | २) भुषण | २) इंटर (बारावी) |
| | ३) विद्वान | ३) बी.ए. |
| १९. बम्बई हिंदी विद्यापीठ, मुंबई | १) उत्तमा | १) एस.एस.सी. |
| | २) भाषा रत्न | २) इंटर (बारावी) |
| २०. गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद | १) तीसरी | १) एस.एस.सी. |
| | २) विनीत | २) इंटर (बारावी) |
| | ३) सवक | ३) बी.ए. |
| २१. आसाम राष्ट्रभाषा प्रचार समिती, गौहत्ती | १) प्रबोध | १) एस.एस.सी. |
| | २) विशारद | २) इंटर (बारावी) |
| २२. हिंदूस्थानी प्रचार सभा, मुंबई | १) तीसरी | १) एस.एस.सी. |
| | २) काबिल | २) इंटर (बारावी) |
| | ३) विद्वान | ३) बी.ए. |
| २३. म्हैसूर हिंदी प्रचार सभा परिषद, बेंगलोर | १) प्रवेश | १) एस.एस.सी. |
| | २) उत्तमा | २) इंटर(बारावी) |
| २४. केरळ हिंदी प्रचार सभा, त्रिवेन्द्रम | १) प्रवेश | १) एस.एस.सी. |
| | २) भूषण | २) इंटर(बारावी |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | मणिपूर हिन्दि परिषद, इम्फाल | १) प्रबोध<br>२) विशारद | १) एस.एस.सी.<br>२) इंटर(बारावी) |
| २६. | कर्नाटक महिला हिंदी सेवा समिती, बैंगलोर | १) हिंदी उनमा<br>२) हिंदी भाषा भूषण | १) एस.एस.सी.<br>२) इंटर/बारावी |
| २७. | म्हैसूर रियासत हिंदी प्रचार समिती, बैंगलोर | १) राजभाषा<br>२) राजभाषा प्रकाश | १) एस.एस.सी.<br>२) इंटर |
| २८. | दारुल ऊलूम देवबन्द, उत्तर प्रदेश | फाझील-ऐ-देओबंन्द | बी. ओ. (अरेबीक) |
| २९. | दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, मद्रास | पारंगत | एम. ए. |
| ३०. | माड असातूल एसलाह सराई मीर, आझमगड (उ.प्र.) | फाझील (अरेबिक) | बी. ए (अरेबिक) |
| ३१. | वंगीय संस्कृत शिक्षा परिषद, कलकत्ता | तीर्थ | एम. ए. (संस्कृत) |
| ३२. | नागपूर विद्यापीठ, नागपूर | १) बी. एम. एड<br>२) एस. एम. एड<br><br><br><br>३) बी. एस. डब्ल्यू<br><br><br>४) बी. पी. ई. | १ व २ बी. एड (फक्त ११ वी व १२ वी वर्गाव गणीत शिकविण्यास पात्र)<br>३) ह्या पदवीसह बी.एड झालेल्यांना माध्यमिक शाळेत शिक्षक पदास पात्र<br>४) बी.ए./बी.कॉम. बी. एससी |
| ३३. | जामितस सालेहत, मालेगाव | अलिमा | बी. ए (अरेबिक) |
| ३४. | पुणे विद्यापीठ, पुणे | उच्च शिक्षण पदविका (डिप्लोमा इन हायर एज्युकेशन) | फक्त ११ वी व १२ वी वर्गास गणी शिकविण्यास पात्र |
| ३५. | मुंबई विद्यापीठ, मुंबई | उच्च शिक्षण पदविका (डिप्लोमा इन हायर एज्युकेशन) | फक्त ११ वी व १२ वी वर्गास गणी शिकविण्यास पात्र |
| ३६. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | उच्च शिक्षण पदविका (डिप्लोमा इन हायर एज्युकेशन) | फक्त ११ वी व १२ वी वर्गात गणी शिकविण्यास पात्र |
| ३७. | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे | ग्रंथपाल विशारद | बी. लिब. |
| ३८. | गुजराथ व्यायाम प्रसारक मंडळ, राजपिपला. गुजराथ राज्य | डी. पी. एड | बी. पी. एड (बी.एड) |
| ३९. | यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक | बी. एड | प्राथमिक माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शाळेत नियमित सेवेत असलेल्या अप्रशिक्षित शिक्षकांनी प्राप्त केलेले शिक्षक पदवीधर [illegible] |
| ३९ | अमरावती विद्यापीठ, अमरावती | बी. पी. ई. | बी. ए. बी. कॉम. बी. एस. सी. |
| ४० | संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी | १) शास्त्री<br>२) आचार्य<br>३) शिक्षा (शास्त्री) | १) बी. ए.<br>२) एम. ए<br>३) बी. एड किंवा बी. टी. |
| ४१. | एम. एस. विद्यापीठ, बरोडा | १) शास्त्री<br>२) आचार्य | १) बी. ए<br>२) एम. ए |
| ४२. | उस्मानिय विद्यापीठ, हैद्राबाद | १) डिप्लोमा इन ओरिएन्टल लर्निंग संस्कृत भाग २ व ३ सह<br>२) बॅचलर ऑफ लर्निंग संस्कृत भाग २ व ३ सह | १) बी. ए<br>२) एम. ए |
| ४३. | उत्कल संस्कृत समिती | १) आचार्य (पी.टी)<br>२) आचार्य (पूर्ण) | १) बी. ए<br>२) एम. ए |
| ४४. | इन्स्टिटयूट ऑफ इंग्लीश ॲण्ड फॉरेन लॅंग्वेजेस, हैद्राबाद | एम. लिट | एम. फिल |
| ४५. | डॉ. बी. आर. आंबेडकर मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद | बॅचलर ऑफ लायब्ररी | बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स |
| ४६. | अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>ब) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | बी. पी. एड (बॅचलर ऑफ फिजीकल एज्युकेशन)<br>बी. एड (फिजीकल एज्युकेशन) | बी. एड (फिजिकल एज्युकेशन) |

\\

विद्यापीठे, मानीव विद्यापीठे , ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था
यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका समकक्षता..

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

पूरक पत्र क्र. समर्क १०९९ /१३४ /मशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक ५ एप्रिल,२००३.

पहा :- १) शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग क्र. एल.एल.इ . ११७१/९८३१९-ऊ, दिनांक १ नोव्हेंबर ,१९७१.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. समक १०९९ /१३४ /मशि-४, दिनांक १४ जून,१९९९.

**पूरकपत्र**

वर अनुक्रमांक २ येथे उल्लेखिलेल्या शासन निर्णय दिनांक १४ जून, १९९९ अन्वये भारतातील ऐच्छिक हिंदी संस्था , ऐच्छिक संस्कृत संस्था यांनी प्रदान केलेल्या परीक्षा /पदव्या /पदविका ना समकक्षता दिल्यासंबंधात १९५०पासून जे शासन निर्णय वेळोवेळी निर्गमित करण्यात आले होते त्यांचे एकत्रीकरण करून विविध समकक्षतांच्या संदर्भात एकच निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर एकत्रीकरणाच्या वेळी शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग क्र. एल.एल.इ . ११७१/९८३१९-ऊ, दिनांक १ नोव्हेंबर ,१९७१च्या परिच्छेद १ मध्ये अनुक्रमांक ६ येथे बम्बई हिन्दी विद्यापीठ , बम्बई या संस्थेची साहित्य-सुधाकर ही परीक्षा बी.ए. शी समकक्ष समजण्यास जी मंजूरी दिलेली आहे तीचा अंतर्भाव झालेला नसल्याचे दिसून येते .

२. उपरोक्त परिस्थितीत शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. समक १०९९ /१३४ /मशि-४, दिनांक १४ जून,१९९९ सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये अनुक्रमांक ४६ नंतर खालीलप्रमाणे अनुक्रमांक ४७ चा अंतर्भाव करण्यात यावा.

| क्र. | संस्थेचे नाव | मान्यता दिलेल्या परीक्षा | समकक्ष परीक्षेसाठी विहित केलेला दर्जा |
|---|---|---|---|
| ४७. | बम्बई हिन्दी विद्यापीठ , बम्बई | साहित्य-सुधाकर | बी.ए. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.द. पडवळ)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

12

प्रति,

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

..२/

विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या
**पदव्या/पदविका समकक्षता**

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. समक-२००७/(२६/०७)/मशि-६

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २८ फेब्रुवारी, २००७

पहा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. समक १०९९/१३४/मशि-४, दि. १४ जून, १९९९

२) शासन पुरक पत्र क्र. समक १०९९/१३४ /मशि-१, दिनांक ५ एप्रिल, २००३

३) मुम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई यांचे क्र. फ-२/२००६-२००७/२५५३ दिनांक १८ डिसेंबर, २००६ चे पत्र

**प्रस्तावना :-** उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये भारतातील ऐच्छिक हिंदी संस्था, ऐच्छिक संस्कृत संस्था, विद्यापीठे, मानीव विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या/पदविकांना काही अटींवर समकक्षता प्रदान करण्यातआल्याचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये अनुक्रमांक १९ वर बम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई या संस्थेच्या **उत्तमा** या परीक्षेस **एस.एस.सी.** व **भाषारत्न** या परीक्षेस **इंटर (बारावी)** अशी समकक्षता दर्शविण्यात आली आहे. तसेच संदर्भाधिन क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये याच संस्थेच्या **साहित्य सुधाकर** या परीक्षेस **बी.ए.** या परीक्षेची समकक्षता असल्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

बम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई या संस्थेच्या नावात दिनांक ४.१२.१९९७ पासून मुम्बई हिन्दी - विद्यापीठ असा बदल धर्मादाय आयुक्तांच्या मान्यतेने केला असल्याचे सदर संस्थेने त्यांच्या संदर्भाधिन क्र. ३ येथील पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे बम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई यासंस्थेच्या उपरोक्त ३ अभ्यासक्रमास मुम्बई हिन्दी - विद्यापीठ या संस्थेच्या नावाने समकक्षता देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** ''बम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई'' या ऐच्छिक हिंदी संस्थेच्या नावात

''मुम्बई हिन्दी - विद्यापीठ'' असा बदल झाला असल्याने सदर संस्थेने मुम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई या नावाने दिलेल्या खालील पदव्यांना समकक्षता प्रदान करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | मान्यता दिलेल्या परीक्षा | समकक्ष परीक्षेसाठी विहित केलेला दर्जा |
|---|---|---|
| मुम्बई हिन्दी - विद्यापीठ, मुंबई | १) उत्तमा | एस.एस.सी |
| | २) भाषारत्न | इंटर (बारावी) |
| | ३) साहित्य सुधाकर | बी.ए. |

२. ही समकक्षता शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. समक १०९९/१३४/मशि-४, **दिनांक१४ जून, १९९९ मधील सर्व अटीं यापुढेही कायम राहतील** या अटीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in यावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. २००७०२२८१४४६२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(नि. न. भोसले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
मुम्बई हिन्दी - विद्यापीठ, ३०६/३०७, उद्योग मंदिर (प.), मुंबई - १६.
उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यालसने,
निवड नस्ती, (मशि-६)

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक,
प्रशिक्षण व खास पथके,
2005 महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्रमांक : आरसीटी ०३०५ / सीआर-२६६ /पोल- ५ अ.    गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २९ जून, २००५.

विषय :- पोलीस शिपाई भरती-२००५
समकक्ष परिक्षेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.प्रशि/पोभ/लोहमार्ग/नाशिक/मोरे/
१३५७, दि.८-४-२००५

वरील विषयावरील आपल्या संदर्भाधिन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीअर सेकंडरी स्कूल परिक्षा तसेच सी.बी.एस.ई. ची बारावी परीक्षा या दोन्ही परिक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा-या इ.१२ वी परिक्षांशी समकक्ष आहेत.

( व. कृ. पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/१३,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०००३२.
दिनांक : २० मे, २०११.

**वाचा**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी-१३९८/प्र.क्र.६७/ ९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी-१३०५/प्र.क्र.२४/ २००५/१३, दिनांक १२ डिसेंबर,२००६.

**शासन निर्णय :-**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राहय धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री.राजेंद्र घुणकीकर विरुध्द महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र.६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

"ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १०वी / १२वी (माध्यमिक / उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला <u>वा</u> यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा."

२ बृहन्मुंबईतील लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये "महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे." तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्ज क्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्र शासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली [National Institution of Open Schooling, New Delhi] या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश

नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्याना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली [National Institute of Open Schooling, New Delhi] यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदावर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

" राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे."

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५१०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बो.वि.निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्रालयीन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई (* पत्राद्वारे)
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (* पत्राद्वारे)
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (* पत्राद्वारे)
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
अवर सचिव, भारत सरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय(शिक्षण विभाग), नवी दिल्ली,
निवड नस्ती.

Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A. Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अ.फायनल प्लॉट नं.१७८ व १७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.:- 020- 25705000 E-mail:- secretary@msbshse.ac.in Fax No.:- 020-25665807

तातडीचे

क्र.रा.मं./समकक्षता/५३९३
पुणे - ४११००४
दिनांक-११ /१०/२०१८

प्रति,

मा.संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
मुंबई ०१.

**विषय** – औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी समकक्षता देणेबाबत.

**संदर्भ** – १.शासन निर्णय क्र.औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एसडी-२दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. विभागीय मंडळांना जा.क्र.रा.मं./समकक्षता/ ५३९४ दि.११/१०/२०१८ द्वारे दिलेले आदेश.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी सदर पत्रासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आपणाकडे पाठविण्यात येत आहेत.

१. दिनांक २७ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयाची प्रत.
२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) यांनी मंडळाकडे प्रथम मान्यतेसाठी/सांकेतिक क्रमांकासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने –
   (१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा – इ.१० वी अनुत्तीर्ण व्यवसाय अभ्यासक्रमासाठी
   (२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा– इ.१० वी उत्तीर्ण व्यवसाय अभ्यासक्रमासाठी
३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्रांना (आय.टी.आय.) मंडळ मान्यता/सांकेतिक क्रमांकासाठी व पुढील प्रक्रीयेसाठी शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकरिता सूचना व टप्पे.

उपरोक्तप्रमाणे पाठविण्यात आलेली सर्व कागदपत्रे आपल्या अधिनस्त असलेल्या मान्यताप्राप्त संस्था/केंद्राना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्याची कृपया व्यवस्था करावी व त्याप्रमाणे कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित कराव्यात.

तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्राची नावे व पत्ते यासह आपण केलेल्या कार्यवाहीच्या प्रतीसह संबंधित विभागीय मंडळ व या कार्यालयास पाठविण्यात यावेत ही विनंती.

आपला विश्वासू,
सचिव,
राज्यमंडळ,पुणे-०४.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव –**
१.मा.श्री राजेंद्र घुमे, सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, पुणे
२.मा.श्री सी.जी. ढेकणे, सहाय्यक संचालक(तांत्रिक),व्य.शि.व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे

Maharashtra State
Board of Secandary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A. Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व १७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.:- 020- 25705000 E-mail:- secretary@msbshse.ac.in Fax No.:- 020-25665807

तातडीचे

क्र.रा.मं./समकक्षता/५३९४
पुणे - ४११००४
दिनांक- ११/१०/२०१८

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय** – औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी समकक्षता देणेबाबत.

**संदर्भ** –१.शासन निर्णय क्र.औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एसडी-२दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२.क्र.रा.मं./समकक्षता/ ५३९३ दि.११ /१०/२०१८ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याबाबतचा विषय दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या परीक्षा समिती, कार्यकारी परिषद व राज्य मंडळ सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदर सक्षम समित्यांचा निर्णयानुसार कार्यवाही करण्यासाठी सक्षम समितीच्या निर्णयाची प्रत व खालीलप्रमाणे सहपत्रे पाठविण्यात येत आहेत.

१. दिनांक २७ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयाची प्रत.
२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) यांनी मंडळाकडे प्रथम मान्यतेसाठी/सांकेतिक क्रमांकासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने –
   (१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा – इ.१० वी अनुत्तीर्ण व्यवसाय अभ्यासक्रमासाठी
   (२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा – इ.१० वी उत्तीर्ण व्यवसाय अभ्यासक्रमासाठी
३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्रांना (आय.टी.आय.) मंडळ मान्यता/सांकेतिक क्रमांकासाठी व पुढील प्रक्रीयेसाठी शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकरिता सूचना व टप्पे.

तरी सदर शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. यासंदर्भात औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आय.टी.आय) यांना व संबंधित यंत्रणेला संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२ वी ची समकक्षता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एस.डी.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१८

**संदर्भ** :-शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एस.डी.२, दि.३० मे, २०१८.

**प्रस्तावना:-**

इ. १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून १ अथवा २ वर्षाचे व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केल्यास, अशा विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ. १२ वी ची समकक्षता देण्याबाबत तसेच इ. १० वी उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केल्यास अशा विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ. १० वी ची समकक्षता देण्याबाबतचा प्रस्ताव कौशल्य विकास व उद्योजकता विभागातर्फे शालेय शिक्षण विभागास सादर करण्यात आला होता.

शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये याबाबत धोरण निश्चित केले होते. तथापि यासंदर्भात प्राप्त सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अधिकारी व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे अधिकारी यांनी यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते. यानुषंगाने सदरहू धोरणामध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२ वी ची समकक्षता देणेबाबतचा संदर्भाधीन दि.३०,मे २०१८ चा शासन निर्णय या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत असून सुधारित धोरण पुढीलप्रमाणे राहील.

(२) राज्यातील सर्व शासकीय तसेच शासन मान्यता प्राप्त / संलग्नता प्राप्त खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी राज्य मंडळाकडून माध्यमिक शाळांप्रमाणे मंडळ मान्यता व मंडळ सांकेतांक घेणे आवश्यक राहील. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील ज्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ.१० वी अथवा इ.१२ वी प्रमाणपत्र परीक्षा/ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्सह समकक्षतेसाठी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्रामार्फत अर्ज करता येईल

(३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२ वी ची समकक्षता देणेबाबत सुधारित धोरण खालीलप्रमाणे आहे.

३.१ राज्य मंडळाच्या इ.१० वी आणि इ.१२ वी च्या परिक्षेमध्ये कोणत्याही दोन भाषा उत्तीर्ण करणे या विद्यार्थ्यांना अनिवार्य राहील.

३.२ राज्य मंडळाच्या इ.१० वी परीक्षेसाठी निर्धारित श्रेणी विषयांमध्ये (उदा. व्यक्तिमत्व विकास इ.) आणि इ.१२ वी परीक्षेकरिता निश्चित करण्यात आलेल्या पर्यावरण शिक्षण व श्रेणी विषयांमध्ये (उदा. शारीरिक व आरोग्य शिक्षण इ.) उत्तीर्ण होणे या विद्यार्थ्यांना अनिवार्य असेल.

३.३ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी राज्य मंडळाच्या विषय योजनेतील २ भाषा व श्रेणी विषय उत्तीर्ण असल्यामुळे या विषयांतून सूट देऊन समकक्षतेकरिता उत्तीर्ण विषय ग्राह्य धरण्यात येतील.

३.४ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेमध्ये कोणत्याही दोन भाषेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल व ज्या भाषेत विद्यार्थी उत्तीर्ण होईल त्या भाषेपैकी उच्च माध्यमिक स्तरावर उपलब्ध माध्यमातून त्यांना शिक्षण घेता येईल.

३.५ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) च्या समकक्षतेसाठी राज्य मंडळाच्या पुढील विषयांसाठीच ट्रान्सफर ऑफ क्रेडिटसचा लाभ देय आहे.

(१) कोणताही एक भाषा विषय (२) गणित (३) विज्ञान व तंत्रज्ञान (४) सामाजिक शास्त्रे.

३.६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) समकक्षतेसाठी कोणत्याही दोन भाषा, पर्यावरण शिक्षण व श्रेणी विषय या विषयांव्यतिरिक्त अन्य चार वैकल्पिक विषयांसाठीच ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्सचा लाभ देय आहे.

(४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) मधील व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेशी समकक्ष मानून मंडळाच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र देण्यासंदर्भात खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दती राहील.

४.१ जे विद्यार्थी इ. १० वी च्या परिक्षेत उत्तीर्ण झाले नाहीत व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ज्या अभ्यासक्रमांची अर्हता इ. १० वी अनुत्तीर्ण अशी आहे, असा १ अथवा २ वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करतील अशा विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ.१० वी च्या प्रमाणपत्राच्या समकक्षतेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्स देण्यात येतील.

४.२ जे विद्यार्थी इ. १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश अर्हता इ. १० वी उत्तीर्ण अशी आहे, असा २ वर्षाचा अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून उत्तीर्ण करतील त्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ. १२ वी च्या प्रमाणपत्राच्या समकक्षतेकरिता चार विषयांचे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् देण्यात येतील.

४.३ ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश अर्हता इ. १० वी उत्तीर्ण अशी आहे, असा एक वर्षाचा अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून उत्तीर्ण केल्यानंतर, त्या व्यवसायाशी संबंधित शिकाऊ उमेदवारी (ट्रेड ॲप्रेंटिसशिप) पूर्ण करुन शिकाऊ उमेदवारी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल, तद्नंतरच त्यांना राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इ. १२ वी च्या प्रमाणपत्राच्या समकक्षतेकरिता चार विषयांचे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्स देण्यात येतील.

४.४ बिगर अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना फक्त दोनच विषयांचे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्स देण्यात येतील. तसेच एक वर्षाचा अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण असणाऱ्या तथापि शिकाऊ उमेदवारी (ट्रेड ॲप्रेंटिसशिप) परीक्षा उत्तीर्ण नसणाऱ्या विद्यार्थ्यांना फक्त २ व्यवसाय विषयांचे क्रेडिटस् देण्यात येतील.

४.५ तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी एक वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतर, शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेली नसेल अशा विद्यार्थ्यांना ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्सच्या आधारे तो विद्यार्थी इ.१२ वी समकक्षतेकरिता पात्र होत असल्यास त्याला अशी समकक्षता म्हणजे गुणपत्रक व प्रमाणपत्र इ. १० वी उत्तीर्ण नंतर किमान दोन वर्षानंतर प्राप्त करता येतील.

(५) (अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील १ अथवा २ वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एकूण गुणांचे रुपांतर राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षेकरिता ४०० गुणांमध्ये करण्यात येईल.

(ब) एक वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण असणाऱ्या तथापि, शिकाऊ उमेदवार परीक्षा उत्तीर्ण नसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एकूण गुणांचे रुपांतर २०० गुणांमध्ये करण्यात येईल.

(क) उपरोक्त "अ" व "ब" करिता ४ अथवा २ विषयांची / विषय गटांची नांवे निश्चित करुन राज्य मंडळास कळविण्याची जबाबदारी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची राहील.

(६) विद्यार्थ्याला इ. १० वी/ इ. १२ वी उत्तीर्ण होण्याकरिता सर्व ४ किंवा २ व्यवसाय विषयांचे क्रेडिटस्/ गुण घेणे अनिवार्य राहील.

(७) श्रेणी विषयांकरिता मंडळाने निर्धारित केलेली जवळची शाळा / कनिष्ठ महाविद्यालय निवडण्याची मुभा या विद्यार्थ्यांना राहिल.

(८) ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्स मिळविण्यासाठी अर्ज करताना सदर अर्जासोबत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या (अंतिम) गुणपत्रिकेची प्रत व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे / अपलोड करणे आवश्यक राहिल. तसेच, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ. १२ वी साठी ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् मिळविण्यासाठी इ. १० वी व इ. १२ वी च्या गुणपत्रिकांची प्रत व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे / अपलोड करणे आवश्यक राहिल.

(९) विद्यार्थ्याच्या एक किंवा दोन वर्षाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अंतिम परिक्षेतील विद्यार्थ्यास प्राप्त गुणाचे रुपांतर २ किंवा ४ क्रेडिटस् प्रमाणे करुन राज्य मंडळाकडे देण्याची जबाबदारी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची राहील.

(१०) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून एक वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम अथवा दोन वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी विद्यार्थी दोन भाषा, पर्यावरण शिक्षण व श्रेणी विषयात उत्तीर्ण झाला असल्यास त्याला सदर विषयास पुन्हा प्रविष्ट होण्याची आवश्यकता असणार नाही. मात्र सदर सर्व विषयात किंवा त्यातील काही विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झाला नसल्यास औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा उपरोक्त अभ्यासक्रम सुरु असताना त्याला सदर विषय उत्तीर्ण होण्यासाठी नियमित विद्यार्थी म्हणून संधी देण्यात येईल. मात्र उपरोक्त अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर सदर विषयास प्रविष्ट व्हावे लागल्यास असे विद्यार्थी पुनर्परिक्षार्थी (Repeater) म्हणून गणले जातील.

(११) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून दोन वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम अथवा एक वर्षाचा व्यवसाय अभ्यासक्रम सुरु असताना दोन भाषा, पर्यावरण शिक्षण इ. विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास त्याला मंडळामार्फत देय असलेले सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील.

(१२) इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना मंडळाची श्रेणी सुधार योजना लागू राहणार नाही.

(१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकविल्या जाणाऱ्या व्यवसाय विषयांची / विषय गटांची यादी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने मंडळाकडे सादर करावी. औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्रांना मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देताना संस्था / केंद्रनिहाय व्यवसाय विषय / विषय गटांनाही मंडळाने विषय मान्यता दयावी. मंडळाच्या पुढील प्रक्रियेसाठी इ. १० वी / इ. १२ वी च्या सदर विषय / विषय गटांना मंडळाने विषय सांकेतांक (Subject Code) निश्चित करावेत.

(१४) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे गुणपत्रिका व प्रमाणपत्र देण्यात येईल. इ. १० वी च्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा (तंत्रशास्त्र

विज्ञान / Technology Science) व इ. १२ वी च्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर शाखेच्या (Stream) रकान्यामध्ये (तंत्रशास्त्र विज्ञान / Technology Science ) असे नमूद करण्यात यावे.

(१५) ट्रान्सफर ऑफ क्रेडिट्स घेऊन विद्यार्थी इ. १० वी व इ. १२ वी परिक्षा उत्तीर्ण झाल्यास पुन्हा मंडळाच्या सदर परिक्षेला नियमित अथवा पुनर्परिक्षार्थी म्हणून प्रविष्ट होऊ शकणार नाही.

(१६) यानुषंगाने राज्य मंडळाने शुल्क व अन्य आवश्यक प्रशासकीय सूचना निर्गमित कराव्यात. तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागातर्फे देखील या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

(१७) इ. १० वी ची समकक्षता मिळालेला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थी इ. ११ वी साठी कोणत्याही शाखेत प्रवेश घेऊ शकेल. तसेच, इ. १२ वीची समकक्षता मिळालेला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थी सर्व शाखांमध्ये पदवीच्या अथवा इ. १२ वी उत्तीर्ण अर्हतेच्या पदविकेच्या प्रथम वर्षाला प्रवेशासाठी पात्र राहिल.

(१८) सदर शासन निर्णय सन २०१८-१९ या वर्षामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्रामध्ये एक किंवा दोन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थी म्हणून प्रत्यक्ष प्रशिक्षण घेत असलेल्या व त्यापुढे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहिल. तथापि, सदर विद्यार्थी संबंधित संस्थांना मंडळ मान्यता व सांकेतांक मिळाल्यानंतर अर्ज करु शकतील. तत्पूर्वीच्या विद्यार्थ्यांना सदर तरतूदी लागू होणार नाहीत.

(१९) सदर शासन निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(२०) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९२६१५४२१८५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

( डॉ.सुवर्णा खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
२. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई
३. सर्व विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा